■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2025-2027

साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस



मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १८ ● अंक ४३ ● मंगळवार, दि. १७ ते २४ मार्च २०२६ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रु.

## घरगुती एलपीजी गॅसचा अवैध वापर रोखण्यासाठी तपासण्या करा

वाशिम, (जिमाका)जागतिक स्तरावर निर्माण होत असलेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर घरगुती एलपीजी गॅसचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी तसेच गॅसचा अवैध वापर व काळाबाजार रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. केंद्र व राज्य शासनाचे आदेश, नियम आणि मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने घरगुती एलपीजी गॅसचा अवैध वापर रोखण्यासाठी गॅस एजन्सींच्या तपासण्या करण्याबाबत दक्षता पथक किंवा फिरते पथक स्थापन करण्याच्या शासनाकडून सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार जिल्ह्यातील तहसीलदार, नगर परिषद मुख्याधिकारी, गटविकास अधिकारी,पोलीस निरीक्षक, पुरवठा निरीक्षक, पुरवठा निरिक्षण अधिकारी,वितरण कंपन्यांचे सेल्स ऑफिसर अशा संबंधित अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात नियमित तपासण्या कराव्यात, असे निर्देश प्रभारी जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील यांनी दिले आहेत. घरगुती एलपीजी गॅस सिलिंडर तसेच व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत राहील, याची विशेष दक्षता घ्यावी. तसेच घरगुती गॅसचा व्यावसायिक किंवा अन्य अवैध वापर होत असल्यास त्यावर तात्काळ कारवाई करावी, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी आवाहन केले आहे. यासोबतच संबंधित विभागांनी केलेल्या तपासण्या व कारवाईचा अनुपालन अहवाल नियमितपणे जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# ग्राहकांनी सजग राहून व्यवहार करावेत : तहसीलदार

## रिसोड येथे जागतिक ग्राहक दिन उत्साहात; खरेदी करताना पक्के बिल घ्यावे

रिसोड, ता. १६ : ग्राहकांनी आपली फसवणूक होणार नाही याकरिता सजग राहून आपले दैनंदिन व्यवहार करावेत, असे प्रतिपादन तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी केले. त्या जागतिक ग्राहक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षपदावरून बोलत होत्या.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून अखिल भारतीय ग्राहक पंचायत रिसोड तालुकाध्यक्ष प्रभाकर पाटील, जिल्हा कोषाध्यक्ष जयंत वसमतकर, तालुका सचिव प्रा. विजय देशमुख, जिल्हा कार्यकारणी सदस्य माजी मुख्याध्यापक गजानन बानोरे, मोहन देशमुख, संजय उकळकर, वीज वितरण कंपनीचे राऊत, पुरवठा अधिकारी गणेश तांगडे, पोलिस पाटील संघटनेचे अध्यक्ष मंगेश सरनाईक, पोलिस उपनिरीक्षक वसंत तहकीक, एसटी महामंडळाचे कालपाड




**रिसोड:** जागतिक ग्राहक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना तहसीलदार प्रतिक्षा तेजनकर.

व्यासपीठावर उपस्थित होते. स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमा पूजनानंतर तहसील कार्यालयातर्फे मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. पुढे बोलताना तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर म्हणाल्या की, ग्राहकांनी आपल्या हक्कासोबतच आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवावी. कोणतीही वस्तू खरेदी करत असताना त्याचे पक्के बिल घ्यावे. त्यामुळे आपली फसवणूक झाल्यास आपल्याला रीतसर तक्रार करता येईल. ऑनलाइन खरेदी करताना पुरेशी काळजी घ्या. रिसोड शहर व तालुक्यामध्ये गॅस, पेट्रोल, डिझेलचा तुटवडा नाही. ग्राहकांनी अफवावर विश्वास ठेवू नये असे त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हा कोषाध्यक्ष जयंत वसमतकर यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या बँक संबंधित तक्रारी, वजन काटे, इलेक्ट्रॉनिक्स काटे संबंधी ग्राहकांच्या तक्रारी, पेट्रोल पंपाच्या तक्रारी, वीज वितरण कंपनीचे तक्रारी, ग्राहकांच्या घरकुल संबंधित तक्रारीचे तहसीलदार तेजनकर यांनी निराकरण करावे अशी मागणी केली.

यावेळी अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे तालुकाध्यक्ष प्रभाकर पाटील, संजय उकळकर, वीज वितरण कंपनीचे राऊत यांची समायोचित भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक हवगीराव गंगनर, सूत्रसंचालन सादिक शेख यांनी केले, तर आभार चेतन जाधव यांनी मानले. कार्यक्रमाला विविध शासकीय कार्यालयाचे प्रतिनिधी, अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे सदस्य, स्वस्त धान्य दुकानदार, तहसील कार्यालयाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आमदार अमित झनक यांच्या वाढदिवसानिमित्त खडकी सदार येथे रक्तदान शिबीर संपन्न

## ६० रक्तदात्यानी केले रक्तदान




**रिसोड :** रिसोड मालेगाव मतदार संघाचे लोकप्रिय आमदार अमित सुभाषराव झनक साहेब यांच्या वाढदिवसाच्या निमित्त खडकी सदार रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबीरात ६० रक्तदात्याने उत्सतपणे रक्तदान करून सामाजिक बांधीलकी जपली आमदार अमित सुभाषराव झनक साहेब यांच्या हस्ते या शिबीराचे उद्घाटन करण्यात आले तसेच केंद्रप्रमुख पदी निवड झालेले साईनाथ शिंदेसर व प्रदिप सदारसर यांचा सत्कार आमदार साहेबाच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमाला आर्जूण पाटील खरात घनशामजी मापारी, राजुभाऊ खांबलकर, रामेश्वर देवकर, राहुल बोडखे, गोपाल मोरे, डॉ बकाल साहेब डॉ विष्णु शिकारे, संतोषजी बिल्लारी सर साईनाथ शिंदे सर प्रविन बकाल सर माधव खडसे सर सपकाळ साहेब इ मान्यवर उपस्थित होते रक्तसंक्रमन श्री गजानन ब्लड बँक वाशीम यांच्या पथकाने यशस्वी पणे पार पाडली या कार्यक्रमाचे आयोजन संजुभाऊ सदार मित्रपरिवार व गावकरी मंडळीने केले होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदिप सदार सर यांनी केले तर आभार प्रदर्शन गणेश सदार यांनी केले.

# यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी



**रिसोड :** येथील श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, रिसोड येथे आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आणि महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाला आणि कार्याला अभिवादन करण्यात आले.

?कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संजय देशमुख हे होते. प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य संजय नरवाडे, पर्यवेक्षक गजानन भिसडे, प्राध्यापक अरुण लिमजे आणि ज्येष्ठ शिक्षिका शोभा राऊत यांची मंचावर उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.अध्यक्षीय भाषणात बोलताना प्राचार्य संजय देशमुख यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनकार्यावर सविस्तर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, 'यशवंतरावजींनी सहकाराचे जाळे विणून ग्रामीण महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलला. त्यांचे विचार आणि कृती आजही तरुण पिढीसाठी प्रेरणादायी आहेत.' त्यांनी पुढे बोलताना सांगितले की यशवंतराव चव्हाण हे संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री होत, त्यापूर्वी ते बॉम्बे स्टेट चे मुख्यमंत्री होते. पुनर्बांधणी करण्याच्या उद्देशाने तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी यशवंतराव चव्हाण यांना देशाचे संरक्षण मंत्री पद दिले, त्यावेळी आचार्य अत्रे यांनी यशवंतराव चव्हाण यांच्याबद्दल गौरवोद्गार काढताना हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावला असे म्हटले होते. विविध क्षेत्रांमध्ये प्रगतीच्या वाटा निर्माण केल्या असे प्राचार्य संजय देशमुख म्हणाले, उपप्राचार्य संजय नरवाडे यांनीही आपल्या भाषणातून यशवंतरावांच्या मुत्सद्दी राजकारणाचे आणि त्यांच्यातील थोर साहित्यिकाचे पैलू विद्यार्थ्यांसमोर मांडले. या प्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि उपस्थितांचे आभार प्रदर्शन प्राध्यापक विजय देशमुख यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. वि.प्र.

# व्हॉईस ऑफ मिडीयातर्फे सकारात्मक पत्रकारीता पुरस्काराने युवा पत्रकार रुपेश पाटील बाजड यांचा गौरव

**रिसोड :** समाजात विधायक बदल घडवून आणणाऱ्या सकारात्मक पत्रकारितेच्या कार्याची दखल घेत व्हॉइस ऑफ मीडिया या आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनेतर्फे दिला जाणारा राज्यस्तरीय सकारात्मक पत्रकारिता पुरस्कार युवा पत्रकार रुपेश पाटील बाजड यांना प्रदान करण्यात आला. ग्रामीण भागातून सुरू झालेल्या त्यांच्या पत्रकारितेच्या प्रवासाची दखल घेत हा सन्मान देण्यात आल्याने वाशिम जिल्ह्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.या पुरस्कारासाठी राज्यभरातून तब्बल ६०० प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यामधून कठोर निकषांवर निवड प्रक्रिया राबविण्यात आली.

१ फेब्रुवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत किमान ४२ किंवा त्यापेक्षा अधिक परिणामकारक बातम्या किंवा लेख प्रसिद्ध असणे हा महत्त्वाचा निकष ठेवण्यात आला होता. विविध विभागांमधून पत्रकारांच्या कार्याचा अभ्यास करून अखेरीस १५ पत्रकारांची निवड करण्यात आली. त्यामध्ये विदर्भ विभागातून रुपेश पाटील बाजड (वाशिम) यांची निवड झाली. मुंबई येथे झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात आयुष्यमान भारत मिशनचे अध्यक्ष ओमप्रकाश शेटे, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री मंगलप्रसाद लोढा, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र कल्याणकर, मुंबई पूर्व प्रादेशिक विभागाचे अपर पोलीस आयुक्त महेश पाटील, उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते राणा सूर्यवंशी तसेच व्हॉइस ऑफ मीडिया चे राष्ट्रीय सरचिटणीस चंद्रमोहन पुप्पाला यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सन्मान प्रदान करण्यात आला.मुंबई येथील यशवंतराव चव्हाण केंद्र येथे अत्यंत भव्य आणि सकारात्मक वातावरणात हा कार्यक्रम पार पडला. यावेळी 'व्हॉइस ऑफ मीडिया'चे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे, राष्ट्रीय

### वाशिम जिल्हात मानाचा तुरा



अध्यक्ष अनिल म्हस्के, राज्य संघटक संतोष चराटे तसेच जिल्हाध्यक्ष भागवत मापारी उपस्थित होते.यावेळी बोलताना रुपेश पाटील बाजड म्हणाले की, ''ग्रामीण भागातून सुरू झालेल्या माझ्या पत्रकारितेची दखल घेऊन मला हा सन्मान दिला गेला, ही माझ्यासाठी मोठी प्रेरणा आहे. माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही आणि पुढेही सकारात्मक व समाजहिताची पत्रकारिता करत राहीन.''



# शेतकर्यांला युद्धझळांचे चटके

अस्मानी असो वा सुलतानी, कोणत्याही संकटामध्ये अंतिमतः भरडला जातो तो अन्नदाता शेतकरीच! इराण आणि इस्त्रायल यांच्यातील युद्धसंघर्षाची झळ देशातील शेतीक्षेत्राला बसू लागली आहे.

इराण, इस्त्रायल आणि अमेरिका यांच्यातील वाढत्या संघर्षाने आता केवळ आखाती देशांच्या सीमांपुरते मर्यादित न राहता जागतिक अर्थव्यवस्थेवर आपले विपरीत परिणाम उमटवण्यास सुरुवात केली आहे. भारतासाठी हा संघर्ष केवळ राजनैतिक चिंतेचा विषय नसून, देशाच्या कृषी अर्थव्यवस्थेवर घाला घालणारा ठरत आहे. विशेषतः महाराष्ट्रातील कांदा आणि द्राक्ष उत्पादक तसेच पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेशातील बासमती तांदूळ पिकवणारे शेतकरी या युद्धाच्या छायेखाली आले आहेत. निर्यातीतील अडथळे, बंदरांवर अडकलेले कंटेनर्स आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील अनिश्चितता यामुळे भारतीय बळीराजाच्या डोळ्यात पुन्हा एकदा पाणी येण्याची चिन्हे दिसत आहेत.

कांदा आणि फलोत्पादनाचे नुकसान

महाराष्ट्र हे देशातील कांदा आणि फलोत्पादनाचे मुख्य केंद्र आहे. मात्र, आखातातील युद्धाने या क्षेत्राचे कंबरडे मोडले आहे. जवाहरलाल नेहरू बंदर अर्थात जेएनपीटी येथे नाशिक आणि महाराष्ट्राच्या इतर भागातून आलेले सुमारे १५० कंटेनर्स सध्या अडकून पडले आहेत. या कंटेनर्समध्ये जवळपास ४,५०० टन कांदा असून, त्याचे गंतव्य स्थान दुबई आणि इतर आखाती शहरे होते.

दुबई हे भारतीय कांद्यासाठी एक प्रमुख व्यापारी केंद्र मानले जाते, जिथून संपूर्ण आखाती देशांमध्ये कांद्याचा पुरवठा होतो. मात्र, युद्धामुळे दुबईची बाजारपेठ ठप्प झाली असून, शिपिंग लाइन्सनी आपली वाहतूक तात्पुरती स्थगित केली आहे. सध्या रमजानचा महिना सुरू असल्याने कांद्याला चांगला भाव मिळण्याची अपेक्षा शेतकर्यांना होती. मात्र, निर्यात थांबल्याने हा सर्व माल आता स्थानिक बाजारपेठेत येण्याची शक्यता आहे, ज्यामुळे कांद्याचे दर कोसळण्याची भीती निर्माण झाली आहे.

महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटनेने या परिस्थितीवर चिंता व्यक्त करत, शेतकर्यांना प्रति क्विंटल १५०० रुपये अनुदान देण्याची आणि बंदराचे शुल्क माफ करण्याची मागणी केली आहे. जोपर्यंत निर्यात पूर्ववत होत नाही, तोपर्यंत सरकारने मध्यस्थी करून खरेदी योजना राबवणे आवश्यक झाले आहे. केवळ कांदाच नव्हे, तर द्राक्षे आणि आंबा यांसारख्या नाशवंत पिकांवरही या युद्धाचा मोठा परिणाम झाला आहे.

सुमारे ३,९०० टन द्राक्षे असलेले ३०० कंटेनर्स जहाजांवर चढवले गेले होते, परंतु युद्धामुळे ही जहाजे पुढे जाऊ शकली नाहीत. आता हा माल परत उतरवून स्थानिक बाजारात विकावा लागणार आहे. महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाचे उपाध्यक्ष मारुती चव्हाण यांच्या मते, सुमारे ६ हजार टन द्राक्ष उत्पादनावर याचा थेट परिणाम होणार आहे.

निर्यातक्षम द्राक्षे जेव्हा स्थानिक बाजारात कमी दराने विकली जातात, तेव्हा शेतकर्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होते.महाराष्ट्रातील केळी उत्पादक शेतकर्यांनाही या युद्धाचा फटका बसू लागला असून सोलापूर जिल्ह्यात याचे गंभीर परिणाम दिसून येत आहेत.

कोट्यवधी रुपयांची केळी निर्यात ठप्प झाली असून शीतगृहांमध्ये सुमारे १२०० कंटेनर्स अडकून पडले आहेत. या संकटामुळे केळीची कापणी पूर्णपणे थांबवण्यात आली आहे. केवळ कापणीच नव्हे, तर आधीच निर्यातीसाठी पाठवलेले कंटेनर्सही आता मोठ्या अनिश्चिततेत अडकले आहेत. काही कंटेनर्स परदेशातून परत मागवले जात आहेत, तर इराणसारख्या देशांत पोहोचलेले कंटेनर्सही परत येत असल्याची माहिती समोर येत आहे.

युद्धजन्य परिस्थितीमुळे जहाजे उपलब्ध नसल्याने शीतगृहात साठवलेला माल आता उतरवून घेण्याची वेळ उत्पादकांवर आली आहे. या सर्व भौगोलिक-राजकीय घडामोडींमुळे महाराष्ट्रातील केळी उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला असून त्यांचे अतोनात नुकसान होत आहे.भारताच्या कृषी निर्यातीत बासमती तांदळाचा वाटा अत्यंत महत्त्वाचा आहे.

## रिसोडमध्ये मोजणी करून प्रॉपर्टी कार्ड देण्याची मागणी



रिसोड : शहरातील प्रभाग क्रमांक २ व ३ मधील रामनगर, गौसपुरा आणि इंदिरानगर परिसरातील नागरिकांना तातडीने जागेची मोजणी करून प्रॉपर्टी कार्ड देण्यात यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ता भारत गुंजकर यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी शुक्रवारी भूमी अभिलेख कार्यालय, रिसोड येथे उपअधीक्षकांना निवेदन सादर केले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, रामनगर, गौसपुरा व इंदिरानगर परिसरातील अनेक नागरिकांना जागेची मोजणी आणि प्रॉपर्टी कार्ड नसल्यामुळे शासकीय घरकुल योजनांचा लाभ मिळत नाही. त्यामुळे अनेक कुटुंबांना घरकुलापासून वंचित राहावे लागत आहे.

या भागात एकूण ६० प्लॉटची मोजणी करण्यात आलीअसलीतरीअजूनही ३३ प्लॉटची मोजणी बाकी आहे. तसेच अनेक नागरिकांना अद्याप प्रॉपर्टी कार्ड देण्यात आलेले नाही. त्यामुळे नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यात अडचणी निर्माण होतअसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. म्हणून संबंधित प्रलंबित प्लॉटची तातडीने मोजणी करून नागरिकांना प्रॉपर्टी कार्ड देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा मागणी मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही सामाजिक कार्यकर्ते भारत गुंजकर यांनी दिला आहे. श.प्र.

## त्रस्त शेतकऱ्याची मंत्री महोदयास आर्त हाक, साहेब न्याय द्या ना !

## राधाकृष्ण विखे पाटील जलसंपदा मंत्री महाराष्ट्र राज्य तथा वाशिम जिल्हा संपर्क मंत्री यांची भेट घेऊन दिले निवेदन,

रिसोड .

रिसोड तालुक्यातील रिसोड ते करडा रस्त्यावरील रहिवाशी व शेतकरी निवेदन देऊन थकलेले व न्यायाच्या प्रतीक्षेत असलेले दौवलतराव भगवानराव वाळके, रा. रिसोड जि. वाशिम,गोपाल पांडुरंग विखे, रा. रिसोड जि. वाशिम,गणेश रामचंद्र चोपडे यांच्यासह इतर शेतकरी तहसीलदार रिसोड यांना निवेदन देत आहेत गतवर्षी सुद्धा ४/९/२०२४ रोजी निवेदन देण्यात आली होती. परंतु दखल घेतली नसल्याने त्रस्त शेतकऱ्यांनी वाशिम च्या सहसंपर्कप्रमुख मंत्री महोदयांनी या शेतकऱ्याची निवेदन स्वीकारले. याबाबत जिल्हाधिकारी यांच्याशी बोलतो असे निवेदन देणाऱ्या शेतकऱ्यांना आश्वासन दिले परंतु हे आश्वासन हवेतच विरते की काय ?,असा संशय शेतकऱ्यांना आहे. रिसोड ते करडा रस्त्यावर चुकीच्या बांधलेल्या पुलामुळे नको त्या ठिकाणी या पुलाचे बांधकाम केले आहे. रस्त्यालगत नाल्याने काढल्याने शेतकऱ्यांच्या शेताची काळी माती वाहून जात आहे.





परिणामी दरवर्षीच्या होणाऱ्या नुकसानीला शेतकऱ्याला सामोरे जावे लागत आहे. या पुलाच्या बांधकामामुळे झाल्याचे खोलीकरण होईना त्यामुळे सतत नुकसान होत आहे.दैवलतराव भगवानराव वाळके व भाग २ मधील सर्व शेतकरी गट क्र. ३७५/२/अ (२७२७) या भागा मध्ये शेती असून त्याच ठिकाणी घरे आहेत.संपूर्ण कुटुंब शेतीवरती अवलंबून आहे. वरील विषयानुसार व इतर शेतकरी यांचे नुकसान हे दरवर्षी होते.चुकीच्या ठिकाणी बांधण्यात आलेल्या पुलामुळे व नाल्याचे खोलीकरण नसल्या मुळे शेतीचे खूप प्रमाणत नुकसान होते. शेतीचा बांध दरवर्षीच फुटतो. तरी सर्व नुकसानग्रस्त शेतकरी यांनी वारंवार तक्रार करूनही संबंधित कोणतेही शासकीय महसूल तथा बांधकाम विभागाचे अधिकारी पाहणी करिता येतच नाहीत. रस्त्यावरील चुकीच्या ठिकाणी पूल बांधत असतांना याची कल्पना असतांना सुद्धा त्यावेळी देण्यात आली आणि बांधकाम केलेल्या त्या पुलामुळे आज सतत नुकसान होत आहे. मंत्री महोदयांना दिलेल्या निवेदनाचा सदर प्रकरणाचा आढावा घेण्यात यावा. अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.किमान या वर्षी सदरील नाल्याचे खोलीकरण करून नाल्याचा पाण्याचा प्रवाहाप्रमाणे पूल तोंडाशी न बांधल्यास दौलतराव भगवानराव वाळके आणि पत्नी मुला-बाळासह संपूर्ण परिवार रिसोड तहसील कार्यालया मध्ये आत्मदहन करील ! असा इशारा निवेदनामध्ये देण्यात आलेला आहे. याबाबतच्या प्रतिलिपी जिल्हाधिकारी कार्यालय वाशीम, तहसिलदार रिसोड, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत बावनकुळेयांना या निवेदनाच्या प्रति पाठवलेल्या आहेत. तरी वेळीच दखल घ्यावी अशी विनंती निवेदना मधून करण्यात आली आहे.

## निर्भया पथकाची कार्यशाळा उत्साहात



रिसोड : सवड : येथील सिद्धेश्वर विद्यालयात रिसोड पोलीस स्टेशन अंतर्गत निर्भया पथकाची विद्यार्थी सुरक्षा संदर्भात मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न झाली. कार्यक्रमाची सुरुवात पथक प्रमुख योगिता भस्मे व उषा सांगळे यांचे विद्यार्थिनींच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर योगिता भस्मे यांनी समाजात मोलाची कामगिरी करणाऱ्या भारतीय कर्तृत्ववान महिलांचा इतिहास सांगून विद्यार्थिनींना प्रेरणा दिली. त्यानंतर करावे, अनोळखी व्यक्ती पासून सावधान कसे राहावे, गुड टच बॅड टच, तक्रार पेटी, हेल्पलाइन नंबर ,कायदेशीर हक्क याबाबत सखोल मार्गदर्शन केले. तसेच एखादी व्यक्ती त्रास देत असेलतर शिक्षक, शिक्षिका व मुख्याध्यापक यांना त्वरित सूचना द्यावी आणि निर्भया पथकाची मदत घ्यावी सर्वांनी निर्भयपणे राहण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी. व्ही . मोरे यांनी केले तर आभार ए. पी. टोंचर यांनी मानले. कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक व

## महाराजस्व अभियानाला नागरिकांचा प्रतिसाद

रिसोड: 'शासनआपल्यादारी' या संकल्पनेला मूर्त रूप देणाऱ्या 'महाराजस्व अभियानाचे' आयोजन रिसोड तालुक्यात रिठद या गावी उत्साहात पार पडले. या विशेष मोहिमेअंतर्गत महसूल विभागाशी संबंधित शेकडो नागरिकांच्या समस्यांचे जागेवरच निराकरण करण्यात आले असून, प्रशासकीय कामात मोठी गतिमानता दिसून आली आहे.

?या एकदिवसीय विशेष शिबिरात नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. अभियानादरम्यान खालील प्रमुख कामे पूर्ण करण्यात आली:दाखल्यांचे वाटप: १०० हून अधिक विद्यार्थ्यांना व नागरिकांना जातीचे, उत्पन्नाचे आणि अधिवास प्रमाणपत्रांचे जागीच वाटप करण्यात आले. महसूल नोंदी: वारस नोंदी, फेरफार उताऱ्यातील दुरुस्त्या आणि ७/१२ वरीलप्रलंबित दुरुस्त्याप्रकरणे तातडीने मार्गी लावन्यात



आलीशिधापत्रिका दुरुस्ती: नवीन शिधापत्रिका देणे आणि जुन्या पत्रिकांमधील नाव वाढवणे/कमी करणे या कामांचा निपटारा झाला. शेतकरी समस्या: शेतजमिनीचे वाद आणिपाणीहक्का संदर्भातीलअर्जांवर सकारात्मक चर्चा करून निर्णय घेण्यात आले. तसेच पंचायत समिती, कृषी विभाग, नोंदणी विभाग, मोजणी विभाग, ह्यांनी सुद्धा आपली उपस्थिती दर्शवून आपल्या विभागाची माहिती दिली व स्टॉल च्या माध्यमातून लोकांना जागेवरच सेवा दिली.

शिबिरामध्ये पुढीलप्रमाणे सेवा देण्यात आल्या, निकाली फेरफार संख्या २९, दुरुस्तीचे स्वीकारलेले अर्ज६७, वाटप डिजिटल७/१२ व८अ उतारा ३३७, वाटप केलेले महसूल विभागाकडीलविविधप्रमाणपत्र १३७, एक खिडकी व्यवस्थेअंतर्गत निकाली काढलेले अर्ज ५२, भूसंपादन कमी जास्तपत्रक ३८, अकृषक कमी जास्त पत्रक २० , याप्रमाणे सेवा देण्यात आल्या. प्रशासकीय तत्परता

तहसील कार्यालयातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी एकाच छताखाली उपलब्ध राहून लोकांच्या तक्रारी ऐकून घेतल्या. यामुळे नागरिकांना जिल्हा किंवा तालुक्याच्या ठिकाणी वारंवार फेऱ्या मारण्यापासून मोठा दिलासा मिळाला. 'सामान्य माणसाला प्रशासकीय कामासाठी त्रास होऊ नये, हाच आमचा उद्देश होता. या अभियानाद्वारे आम्ही जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला असून, भविष्यातही अशाच प्रकारे पारदर्शक काम सुरु राहील.' असे तहसीलदार रिसोड प्रतीक्षा तेजनकर यांनी विश्वास व्यक्त केला नागरिकांचे समाधानोल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेले काम अवघ्या काही तासांत पूर्ण झाल्याने उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले. विशेषतः ग्रामीण भागातून आलेल्या शेतकऱ्यांनी या उपक्रमाचे मनापासून स्वागत केले आहे. या पुढे पण दिनांक २०मार्च ला चिखली येथे होणाऱ्या शिबिराला उपस्थित राहून आपल्या तक्रारीचे निराकरण करून घ्यावे असे आवाहन उपविभागीय अधिकारी सौ देवकर यांनी केले. श.प्र.

पिंगलाक्षी एक्सप्रेस (मराठी साप्ताहिक ) । R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

# 'विठाई मायनॉरिटी प्रतिष्ठान'चा 'पाणी वाचवा' संदेश



**रिसोड** - वाढत्या उन्हाळ्याची चाहूल लागताच पाणी टंचाईच्या झळा बसू लागल्या आहेत. अशा परिस्थितीत पाण्याचा अपव्यय टाळून भविष्य सुरक्षित करणे ही काळाची गरज बनली आहे.

याच सामाजिक जाणिवेतून आज दि. १६ मार्च २०२६ रोजी रिसोड शहरातील पठाडे नगर भागात विठाई मायनॉरिटी बहुउद्देशीय प्रतिष्ठान, रिसोड च्या वतीने 'पाणी वाचवा, जीवन वाचवा' या अभियानांतर्गत जनजागृती करण्यात आली. यावेळी उपस्थित महिलांना पाण्याचे महत्त्व पटवून देत, नळांना तोट्या बसवण्याचे व पाण्याचा अपव्यय टाळण्याचे आवाहन करण्यात आले. आजच्या धावपळीच्या युगात नैसर्गिक संसाधनांचा वापर बेसुमार होत आहे. विशेषतः घरगुती वापरामध्ये नळ उघडे सोडून देणे, विनाकारण अंगण धुणे किंवा वाहने धुण्यासाठी पाण्याचा अतिवापर करणे यामुळे पाणी टंचाई गंभीर रूप धारण करत आहे. हीच बाब लक्षात घेऊन विठाई मायनॉरिटी प्रतिष्ठानने पठाडे नगरमध्ये थेट घरोघरी जाऊन महिलांशी संवाद साधला. प्रतिष्ठानचे सदस्य जियाउर खान यांनी एका गृहिणीला प्रात्यक्षिक दाखवत संदेश दिला की, 'पाणी हे केवळ संसाधन नसून ते जीवन आहे. जर आपण आज पाणी वाचवले नाही, तर उद्याच्या पिढीला भीषण संकटाचा सामना करावा लागेल.' अनेक ठिकाणी सार्वजनिक तसेच खासगी नळांना तोट्या (टॅप) नसल्यामुळे हजारो लिटर पाणी वाया जाते. 'नळाला तोटी लावा, पाणी वाया जाण्यापासून वाचवा' असा महत्त्वपूर्ण संदेश यावेळी देण्यात आला. या जनजागृती कार्यक्रमाचे नेतृत्व विठाई मायनॉरिटी बहुउद्देशीय प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रदीप खंडारे यांनी केले. याप्रसंगी बोलताना खंडारे म्हणाले की, 'पाणी बचतीची सुरुवात ही स्वतःच्या घरापासून व्हायला हवी. महिला या घराच्या केंद्रस्थानी असतात, त्यामुळे त्यांनी ठरवले तर पाण्याची मोठी बचत होऊ शकते.' या मोहिमेत संस्थेचे सदस्य जियाउर खान यांच्यासह अंगणवाडी सेविका आम्रपाली पठाडे, जया जुमडे, स्नेहल गजभिये, सानिया शाह, शोभा गवळी, खुशी शेख शकिल, रिना शेख शकिल, राधा नरवाडे, आफरिन शेख शाहिल, नूर जहा सैय्यद हानिफ, नगमा नसिम शहा, नाझिया समद शहा यांच्यासह पठाडे नगरमधील मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

# एकाच दिवशी ६ कोटी ८९ लाखांच्या ८४४ प्रकरणांचा निपटारा

## राष्ट्रीय लोक अदालतीला उत्स्फूर्त प्रतिसाद; वकील संघ व पोलीस दलाचे सहकार्य






**वाशिम :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार शनिवार दि.१४ मार्च २०२६ रोजी जिल्हा न्यायालय व सर्व तालुका न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले. या लोक अदालतीत मोठ्या प्रमाणावर प्रकरणांचा तडजोडीने निपटारा करण्यात येऊन नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

लोक अदालतीचे उद्घाटन उपस्थित पक्षकारांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष अनिल सुब्रमण्यम, जिल्हा न्यायाधीश-१ जे. पी. झपाटे, तसेच जिल्हा विधिज्ञ मंडळाचे अध्यक्ष अनुप बाकलीवाल यांची प्रमुख उपस्थिती होती. या राष्ट्रीय लोक अदालतीत न्यायालयात प्रलंबित असलेल्या एकूण ४ हजार ५५२ प्रकरणे तसेच १० हजार ४२७ दाखलपूर्व प्रकरणांपैकी एकूण ८४४ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. यामध्ये ८०६ प्रलंबित प्रकरणे व ३८ दाखलपूर्व प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली. या प्रकरणांमधून एकूण ६ कोटी ८९ लाख ५४ हजार २८७ रुपयांची रक्कम वसुली व तडजोडीद्वारे निकाली निघाली असल्याची माहिती देण्यात आली.

राष्ट्रीय लोक अदालत यशस्वी होण्यासाठी जिल्हा वकील संघ, जिल्हा पोलीस दल यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच लोक अदालतीच्या कामकाजासाठी रामकृष्णजी राठी विधी महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांनीही सक्रिय सहभाग नोंदवला. न्यायालयीन प्रकरणे तडजोडीने व जलद गतीने निकाली काढण्यासाठी लोक अदालतीचे महत्त्व अधोरेखित झाले असून, भविष्यातही नागरिकांनी अशा उपक्रमांना प्रतिसाद द्यावा, असे आवाहन करण्यात आले.

# थकीत भाडे असणाऱ्या दुकानांवर सील/जप्तीची कारवाई



रिसोड : नगर परिषद रिसोड द्वारे दिनांक १३ मार्च रोजी थकीत दुकान भाडे वसुली मोहीम मुख्याधिकारी यांचे नेतृत्वात राबविण्यात आली. सदर मोहिमेअंतर्गत नगर परिषद कार्यालयाचे विविध व्यापारी संकुल मधील थकीत दुकान भाडे असणाऱ्या दुकानांवर दुकान जप्त/सील/अडकावनीची कारवाई करण्यात आली. त्यामध्ये प्रामुख्याने लोणी नाका ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक यादरम्यानच्या रस्त्यालगतचे BOT तत्वावरील नगर परिषद मालकीचे व्यापारी संकुल मध्ये एकूण सहा दुकाने सील करण्यात आले. या सहा दुकान भोगवटदार यांना वारंवार थकीत भाडे भरणा करणेबाबत कळविण्यात आल्यानंतरही भाडे भरणा न केल्याने व त्यांच्या कडे एकूण पाच लक्ष पेक्षा अधिक रक्कम थकीत असल्याने सदर दुकानांना मुख्याधिकारी यांचे मार्फत सील करण्यात आले व त्याबाबत पंचनामा करून त्याची प्रत दुकानांवर लावण्यात आली.

दुकान भाडे वसुली मोहीमे दरम्यान एकूण रु. चार लक्ष चाळीस हजाराचे दुकान भाडे धनादेशाद्वारे वसूल करण्यात आले. तसेच इतर सर्व भोगवटदार यांना त्यांचेकडे असलेले दुकान भाडे लवकरात लवकर नगर परिषद मध्ये भरणा करण्याबाबत सूचित करण्यात आले तसेच भविष्यात या प्रकारच्या मोहीम नियमित राबविण्यात येणार असलेबाबत अवगत करण्यात आले. सदर मोहिमे मध्ये मुख्याधिकारी सतिश शेवदा, कार्यालय अधिक्षक सुनील मगर, प्रशासकीय अधिकारी शिवनंदन बरडे, पाणी पुरवठा अभियंता नंदकिशोर डाखोरे, संगणक अभियंता धोंडीबा डुकरे, नगर परिषद कर्मचारी रितेश इरतकर, रवि जुमडे, गणेश गायकवाड, बजरंग हिरण, तुषार इंगळे इत्यादी उपस्थित होते.

# पेट्रोल पंपावर केरोसिनचे वाटप करण्याचा विचार : मंत्री भुजबळ

## गॅसटंचाईवर उपाययोजना: हायकोर्टलाही दिली माहिती

प्रतिनिधी | मुंबई

आखाती युद्धामुळे निर्माण झालेली गॅस टंचाई अजूनही पूर्णपणे आटोक्यात आलेली नाही. घरगुती सिलिंडरसाठी लोकांच्या रांगा कायम आहेत. व्यावसायिक सिलिंडरचा पुरवठा पूर्ण क्षमतेने सुरू झालेला नाही. त्यामुळे पेट्रोल पंपांवर केरोसिन (रॉकेल) वाटपाचा सरकार विचार करत आहे, अशी माहिती अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी सोमवारी विधान परिषदेत दिली. गॅसचा काळाबाजार रोखण्यासाठी नियुक्त केलेल्या दक्षता पथकांनी राज्यात जानेवारी ते १५ मार्च २०२६ या कालावधीत २१२९ तपासण्या केल्या आहेत. या कारवाईत १२०८ गॅस सिलिंडर जप्त करण्यात आले असून जप्त मालाची किंमत ३३ लाख ६६ हजार ४११ रुपये आहे. याप्रकरणी २३ गुन्हे दाखल करण्यात आले असून १८ जणांना अटक करण्यात आली आहे. असेही ते म्हणाले.

नियम ९३ अन्वये उपस्थित चर्चेत भुजबळ यांनी सांगितले की, एलपीजीला पर्यायी इंधन म्हणून केरोसिन वितरणाचा पर्यायही राज्य शासनाच्या विचाराधीन असून याबाबत दाखल याचिकेवरून उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाला ११ मार्च रोजी माहिती देण्यात आली आहे. सध्या रुग्णालये, शैक्षणिक संस्था, स्मशानभूमी, वृद्धाश्रम आणि अनाथाश्रमांना १०० टक्के तर संरक्षण, शासकीय विभाग, रेल्वे, विमान वाहतूक तसेच पोलीस आणि तुरुंगांच्या उपहारगृहांना ७० टक्के तर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची उपहारगृहे, औषध उद्योग, बीज प्रक्रिया आणि मत्स्यपालन क्षेत्राला ५० टक्के सिलिंडर दिले जात आहेत, असेही भुजबळ म्हणाले.

### दिव्य मराठी नॉलेज

### पंपावर केरोसिन विक्रीने 'पेसो' नियमांचे उल्लंघन

मुंबई पेट्रोल डिलर्स असोसिएशनचे माजी अध्यक्ष रवी शिंदे म्हणाले की, पंपावर पेट्रोल, डिझेलशिवाय इतर कोणताही ज्वलनशील पदार्थ साठवणे हे 'पेसो'च्या (पेट्रोलियम अँड एक्सप्लोझिव्ह सेफ्टी ऑर्गनायझेशन) नियमांविरुद्ध आहे. 'पेसो'च्या कठोर नियमावलीनुसार, पेट्रोल पंपावर केवळ ठराविक ज्वलनशील पदार्थच भूमिगत टाकीत साठवता येतात. सध्या पंपांवर रॉकेलसाठी स्वतंत्र भूमिगत टाक्या उपलब्ध नाहीत. तरीही सरकारने केरोसिन विक्रीचा आग्रह धरला. तर तो कायद्याचा भंग ठरेल. रॉकेल साठ्यासाठी भूमिगत टँकची व्यवस्था होत नाही, तोपर्यंत त्याची विक्री तांत्रिकदृष्ट्या सुरक्षित आणि कायदेशीर ठरणार नाही. आणि असे टँक तयार करणे कोणालाही परवडणारे नाही.

**ग्रामीण भागात रेशनकार्डावर दोन लिटर केरोसिन मिळू शकते :** सूत्रांनी सांगितले की, ग्रामीण भागात रेशनकार्डावर दोन लिटर केरोसिन पुरवठा करण्याची तयारी प्रशासनाने केली आहे. त्या दृष्टीने अधिकाऱ्यांची आढावा बैठक झाली. एका कार्डावर एक महिन्यासाठी हा पुरवठा केला जाऊ शकतो.

### गॅस उत्पादनात २ हजार मेट्रिक टनांची वाढ

रिफायनरीतील एलपीजी उत्पादन प्रति दिवस ९,००० मेट्रिक टनांवरून ११,००० मेट्रिक टनांपर्यंत नेण्यात आले आहे. जिल्हास्तराबर विशेष समित्या आणि नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले असून तेल कंपन्या आणि गॅस वितरकांसोबत नियमित बैठकाही घेतल्या जात आहेत. एलपीजी बुकिंग ॲप आणि मिस्ड कॉल सेवेमधील तांत्रिक अडचणी दूर करण्याचे निर्देश देण्यात आले असून वाहतूक व वितरणासाठी पोलीस संरक्षणही देण्यात येत आहे असे भुजबळ यांनी सांगितले.

# ग्राहक हक्कांची जाणीव हीच खरी प्रगतीची दिशा




**वाशिम :** ग्राहक हा बाजारपेठेचा केंद्रबिंदू असून त्याच्या हक्कांचे संरक्षण आणि जागरूकता ही काळाची गरज बनली आहे. याच पार्श्वभूमीवर जागतिक ग्राहक दिनानिमित्त वाशिम येथे जिल्हास्तरीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ग्राहक हक्कांविषयी जनजागृती करण्यासाठी आयोजित या उपक्रमात विविध शासकीय विभाग, अखिल भारतीय ग्राहक पंचायत, जिल्हा पुरवठा कार्यालय तसेच तहसील प्रशासन यांचा संयुक्त सहभाग राहणार आहे. बदलत्या बाजारव्यवस्थेत ग्राहकांची फसवणूक टाळण्यासाठी माहिती, कायदेशीर मार्गदर्शन आणि तक्रार निवारण यंत्रणेची माहिती नागरिकांना उपलब्ध करून देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

कार्यक्रमात ग्राहक संरक्षण कायदा, ग्राहकांचे मूलभूत हक्क, ऑनलाईन व्यवहारातील सुरक्षितता तसेच शासकीय योजनांची माहिती देणारे माहितीपर स्टॉल उभारले जाणार आहेत. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना थेट अधिकाऱ्यांशी संवाद साधण्याची संधी मिळणार असून त्यांच्या समस्या व शंका त्वरित मांडता येणार आहेत.

आजच्या स्पर्धात्मक युगात ग्राहक सजग असणे अत्यावश्यक झाले आहे. चुकीच्या जाहिराती, निकृष्ट दर्जाच्या वस्तू, डिजिटल फसवणूक यांसारख्या प्रकारांपासून बचाव करण्यासाठी ग्राहक शिक्षण हीच सर्वात प्रभावी ढाल आहे, असा संदेश या कार्यक्रमातून दिला जाणार आहे. प्रशासनाकडून नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपल्या हक्कांची जाणीव करून घ्यावी व जागरूक ग्राहक बनण्याचा संकल्प करावा.

# रिसोडच्या शेतकऱ्याचा आत्मदहनाचा इशारा!



रिसोड - राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे दि. ८ जून रोजी वाशिम जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता, रिसोड तालुक्यातील शेतकरी दौलता वाकळे व भोपाल विखे यांनी त्यांना थेट भेटून आपली समस्या त्यांच्या समोर मांडली. या वेळी शेतकऱ्यांनी नाल्याच्या खोलीकरणाचा व पूल बांधकामाचा प्रश्न उपस्थित केला.

शेतकरी दौलता वाकळे यांनी मंत्री विखे पाटील यांच्याशी बोलताना स्पष्टपणे सांगितले की, 'दरवर्षी नाल्यातून पाणी वाहून जात असून त्याचे योग्य नियोजन, खोलीकरण व पुलाचे बांधकाम झालेले नाही. त्यामुळे आमच्या शेतीचे मोठे नुकसान होते. जर यावर्षी देखील प्रशासनाने दुर्लक्ष केले, तर पावसाळ्यात आमचे नुकसान निश्चित आहे.

अशा परिस्थितीत आम्हाला आत्मदहना शिवाय पर्याय राहणार नाही.' या गंभीर व भावनिक व्यथेला उत्तर देताना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी 'मी जिल्हाधिकारी यांच्याशी तात्काळ बोलून आवश्यक ती कारवाई करण्याचे निर्देश देईन' असे आश्वासन शेतकऱ्यांना दिले. या संवादात शेतकऱ्यांचा आक्रोश स्पष्टपणे जाणवला. प्रशासन व संबंधित यंत्रणांनी याची गांभीर्याने दखल घेतली नाही, तर तालुक्यातील अन्य शेतकरीही आंदोलनाच्या मार्गावर जाण्याची शक्यता आहे. प्रशासनाने वेळेवर योग्य नियोजन करून शेतकऱ्यांचा विश्वास जपावा व या भागात शेतीसाठी सुरक्षित पर्यावरण निर्माण करावे, हीच या घटनेतून उमटणारी महत्त्वपूर्ण मागणी आहे.